# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषय:- पीएच.डी. करिता प्रवेशित विद्यार्थ्यांच्या कोर्सवर्क संदर्भात....

सर्व अधिविभागप्रमुख/ संचालक/समन्वयक यांना कळविण्यात येते की, पीएच.डी. करिता शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये प्रवेशित विद्यार्थी तसेच यापुर्वी एम.फिल./पीएच. डी. चे प्रवेशित तथापि अद्याप कोर्स वर्क वेळेत पूर्ण न झालेले विद्यार्थी यांच्या **Course Work** बाबतची कार्यवाही विहित केलेल्या नियमानुसार (कोर्सवर्कचे वेळापत्रक व **Credit Hours** नुसार) पूर्ण करण्याची आहे.

यु.जी.सी., नवी दिल्ली यांच्या निकषांनुसार व त्या अनुंषंगाने तयार केलेल्या नियमानुसार पीएच.डी. **Course Work** बाबतची प्रकिया त्या शैक्षणिक वर्षातील पहिल्या किंवा दुस-या सत्रात पूर्ण होणे आवश्यक आहे. **(RRD 10 (10.8)) All candidates admitted to the Ph.D. Programmes shall be required to complete the course work, as approved by the Academic Council of Shivaji University, Kolhapur during the initial one or two semesters.**

त्याचप्रमाणे सर्व अधिविभागांनी पीएच.डी. विद्यार्थ्यांबाबत, संबंधित विद्यार्थ्यांनी कोर्सवर्क पूर्ण केल्याची खातरजमा करूनच संबंधित विद्यार्थ्यांचे कोर्सवर्क परीक्षेचे अर्ज व परीक्षा याबाबत कार्यवाही करावी.

याकरिता कोर्सवर्कचे नियोजित वेळापत्रक, आमंत्रित तज्ञांची व पात्र विद्यार्थ्यांची यादी याची प्रत पीजीबीयुटीआर विभागास पाठविण्यात येऊन त्यास मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करावी.

आदेशावरून,

(श्री. विलास एस. सोयम)
उपकुलसचिव

पीजीबीयुटीआर विभाग /2348
दि. 06 JUL 2024
**प्रत :-**

१. सर्व अधिविभागप्रमुख/**संचालक/समन्वयक/पदव्युत्तर अधिविभाग** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
२. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ
३. परीक्षा विभाग
४. इंटरनेट सेल (सर्व संशोधनार्थींच्या माहितीकरीता सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्याकरीता)